# मंदीत टिकण्यासाठी दैनंदिन खर्च कमी करा

## डॉ. ए. एम. गुरव; इंजिनिअरिंग असोसिएशनमध्ये व्याख्यान

कोल्हापूर, ता. १८ : भांडवली गुंतवणूक सध्या नको. दैनंदिन खर्च कमी करावेत, तरच मंदीत टिकाल, असे आवाहन डॉ. ए. एम. गुरव यांनी आज येथे केले. 'मंदीशी सामना कसा करावा' या विषयावर उद्योजकांसाठी कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनने चर्चासत्र आयोजित केले होते.

असोसिएशनच्या हॉलमध्ये व्याख्यान झाले. मंदीच्या कारणामध्ये व्याजाचा दर, वाढीव खर्च, मागणी आणि पुरवठ्यामध्ये असमतोल, आयात जास्त आणि निर्यात कमी, बेरोजगारी आदींचा समावेश असल्याचे गुरव यांनी सांगितले.

डॉ. गुरव म्हणाले, ''भांडवली गुंतवणूक सध्या नको, दैनंदिन खर्च कमी करावेत, संशोधन व नवनिर्मितीचा विकास करावा, पुढील पाच वर्षांचे योग्य नियोजन करावे, अधिक भांडवलीकरण होणार नाही, याची दक्षता घेतल्यास मंदीत तरले जाईल. ज्यांना सध्या असलेल्या उद्योग व व्यापारापेक्षा वेगळी वाट निवडायची असल्यास नीट विचार करून निवडा. सध्या उद्योजक व व्यापाऱ्यांना भेडसावत असलेल्या अडचणींची तीव्रता जाणून घ्या व तीव्रतेनुसार आपल्याकडील साधनांचा वापर करून मंदीतून बाहेर येण्याचा प्रयत्न करा.''




**कोल्हापूर : कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनमध्ये 'मंदीचा सामना कसा करावा' याबाबत मार्गदर्शन करताना डॉ. ए. एम. गुरव. समोर उद्योजक.**

यावेळी उपस्थित उद्योजकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही डॉ. गुरव यांनी दिली. असोसिएशनचे अध्यक्ष अतुल आरवाडे यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष रणजित शाह यांनी आभार मानले. सचिव प्रदीप व्हरांबळे यांनी सूत्रसंचालन केले. रणजित शाह, कमलाकांत कुलकर्णी, रामप्रताप झंवर, बाबासो कोंडेकर, श्रीकांत दुधाणे, प्रसन्न तेरदाळकर, करण चरणे, हिंदुराव कामते, जयराजभाई वसा, शाम देशिंगकर, सुशील हंजे, दिलावर शेख, सूर्यकांत खोत, पेंडसे, आर. आर. मुसानी, मंदार आरवाडे, दिलीप चव्हाण, उमेश शेळके, विकास पाटील, सी. ए. पंडितराव, संतोष बांदेकर, आनंद पेंडसे, अब्दुलगणी मुल्लाणी, राहुल सुलताने, नरेंद्र माटे उपस्थित होते.



वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण कुलसचिव विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. सोबत विनय पाटील, आर.डी.पाटील वडगावकर, व्ही. एम. पाटील, सविता पाटील, अलोक जत्राटकर, आदी.

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत हर्षद औटी प्रथम

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत औरंगाबाद येथील मातोश्री कांचनलाल देसरडा कॉलेजचा विद्यार्थी हर्षद औटीने प्रथम क्रमांक पटकावला. न्यू कॉलेज आणि डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रम समितीच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा आयोजित केली होती.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे व्हाइस चेअरमन आर. डी. पाटील वडगावकर होते. स्पर्धेत पुण्याच्या मॉडर्न कॉलेज येथील तेजस दिनकर पाटीलने द्वितीय तर येथील विवेकानंद कॉलेजमधील प्रणाली माणिक मगदूमने तृतीय क्रमांक मिळवला. कागलच्या डी. आर. माने कॉलेजची विद्यार्थिनी शर्मिला पाटील व कमला कॉलेजची विद्यार्थिनी ऋतुजा पाटील यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

प्राचार्य व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. संयोजन समितीचे सचिव प्रा. अविनाश पाटील यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. कविता गगराणी यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठात 'नॅक'ची तयारी सुरू

कोल्हापूर टाइम्स टीम



## डिसेंबरमध्ये होणार मूल्यांकन

डिसेंबर २०१९ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या होणाऱ्या नॅक मूल्यांकनाची तयारी सुरू झाली आहे. डिसेंबरमध्ये नॅक समितीला प्राथमिक फेरीअंतर्गत सादर करावयाच्या कागदपत्रांची तयारी पूर्ण झाली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी दिली.

नॅकतर्फे शिवाजी विद्यापीठाच्या नॅक मूल्यांकनाची मुदत डिसेंबरमध्ये संपत आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्यावतीने नॅकला सामोरे जाण्याचे नियोजन करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी शैक्षणिक, प्रशासनाचे त्रयस्थ तज्ज्ञांमार्फत ऑडिट करण्यात आले. त्यांनी सर्व विभागांची पाहणी करून त्रुटी सुचवण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने संबंधित विभागांना त्रुटी पूर्ण करण्यासंदर्भात प्रशासनाने सांगितले आहे. विद्यार्थ्यांचा सर्व्हेदेखील करण्यात आला असून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यात आल्या आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमोर अधिविभागांनी सादरीकरण केले आहे. मागील आठवड्यात डेटा कलेक्शनसाठी कॅम्प घेण्यात आला होता. यावेळी नॅकच्या बदललेल्या मूल्यांकन पद्धतीबद्दल माहिती देण्यात आली. नॅकच्या पार्श्वभूमीवर विविध विभागांच्या बैठका सुरू असल्याचे डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.